दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.११ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची सपत्नीक महापूजा



**पंढरपूर : वृत्तसंस्था**

आषाढी एकादशीच्या वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. अनेक वर्षांपासून शिस्तबद्ध पद्धतीने दिंड्या निघतात. त्यामुळे सकारात्मक वातावरण तयार होते. अशा वारीत सहभागी होणाऱ्या सर्व वारकऱ्यांना सोयी-सुविधा देण्यात राज्य शासन कोठे ही कमी पडणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. समाजातील सर्व घटकातील लोकांच्या जीवनात सुख व समृद्धी येण्यासाठी राज्यसमोरील कोरोनासह सर्व अडचणी दूर करण्याचे साकडे त्यांनी विठ्ठल चरणी घातले.

आषाढी एकादशी निमित्त श्री.शिंदे आणि त्यांच्या पत्नी सौ.लता शिंदे यांनी मानाचे वारकरी मु.पो. रुई, ता.गेवराई, जि.बीड येथील मुरली भगवान नवले (५२) आणि सौ.जिजाबाई मुरली नवले (४७) या दाम्पत्यासोबत विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा केली. महापूजेनंतर विठ्ठल मंदिर समितीच्यावतीने आयोजित मानाच्या वारकऱ्यांचा सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्यासह समितीचे अन्य सदस्य, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मागील दोन वर्षे कोरोनामुळे आषाढी वारी होऊ शकलेली नाही. त्यामुळे या वर्षी १० लाखांपेक्षा अधिक वारकरी पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले आहेत. लाखो वारकरी विठू नामाचा जयघोष करत मोठ्या उत्साहाने चालत आलेले आहेत. या सर्व वारकऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. शासन शेतकरी, वारकरी, शेतमजूर, कामगार यांच्यासह राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. राज्यात आषाढी एकादशीची वारी एक महापर्व असून या वारीला एक मोठी परंपरा लाभलेली आहे. आषाढी एकादशीला महापूजा करण्याचा सन्मान मिळाल्याने हा दिवस माझ्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा दिवस असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. राज्यातील १२ कोटी जनतेच्यावतीने आपण ही शासकीय महापूजा केली असल्याचे सांगून त्यांनी राज्यातील जनतेला आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

# मुंबई-गोवा महामार्गावर भरधाव वेगाने जाणारी कार तलावात बुडाली


**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील मुंबई गोवा महामार्गावर खरोशी फाटा जवळ चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने तलावात कार बुडाल्याची घटना आज दिनांक १० जून रोजी घडली. तरुणांनी प्रसंगावधान राखून कार चालकाला वाचवले.

कल्याण वरुन पेण ज्या दिशेने येत अस-लेली एम. एच. ०५- डी एस ५५०१ ही कार चालक भरधाव वेगाने चालवताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने सदरची गाडी तलावात बुडाली.

ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखून तात्काळ तलावात उडी मारून कार चालकाचे प्राण वाचविले. चालकाचे प्राण वाचविणार्या तरुणांचे ग्रामस्थ व प्रशासना कडून कौतुक होत आहे.

घटनेची माहिती मिळताच दादर सगारी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक गोविंदराव पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कमलाकर भऊड आदी पोलिसांनी घटनास्थळी त्वरित हजर राहून क्रेनच्या सहाय्याने तलावातुन काढण्यात आली.



# बोर्लीपंचतन शहराच्या मुख्य रस्त्याला वाली कोण? ; ग्रामस्थांचा संतप्त सवाल

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - बोर्लीपंचतन शहराच्या बाजारपेठेतून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर, पावसाळी पाण्यात हरवलेल्या भल्या मोठया खड्ड्यांमुळे अपघ-ाताचा धोका वाढला आहे. तक्रार करूनही या रस्त्याच्या दुरुस्तीकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.




श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन दृष्टीने बोर्लीपंचतन बाजारपेठ नेहमीच गजबलेली पाहायला मिळत आहे. कारण एक ते दीड किलोमीटर अंतरात वसलेली मोठी बाजारपेठ म्हणून तेवढीच प्रसिद्ध आहे. याच बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची सद्या दुरवस्था झालेली आहे. अनेक ठिकाणी मोठं - मोठ्या खड्डुयांची वाढ झाली आहे. त्यामुळे पाण्यातील खड्ड्यांचा अंदाज न मिळाल्याने बाईकस्वार खड्यात आपटून कोसळल्याच्या घटना समोर येत आहेत. या वाढत्या समस्येला दूर करण्यासाठी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येत आहे. मात्र, नेहमीप्रमाणे दुर्लक्ष होत असलेल्या कारभारामुळे परिसरातील रहिवाशांबरोबर वाहनचालकांमध्ये संतापाची लाट आहे.

या रस्त्यावरील पोहमील नाका, छत्रपती शिवाजी चौक व एसटी स्थानक परिसर या तीन ठिकाणी पावसामुळे रस्त्याच्या

.../२

# सुधागड तालुक्यात भेरव येथे तरस आढळला नागरिकांमध्ये भीती



**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यात भेरव गावाजवळ काही नागरिकांना तरसाचे दर्शन झाले आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. येथील तरुणाने भेरव गावाजवळील रस्त्यावर फिरणाऱ्या तरसाला पाहिले व त्याचा व्हिडीओ बनविला आहे.

हा व्हिडीओ अनेक व्हॉट्सअप ग्रुप व समाज माध्यमांवर फिरत आहे. या संदर्भात पाली-सुधागड वनक्षेत्रपाल रितेश नागोशे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की वन्यजीव सहसा माणसावर हल्ला करत नाहीत. ते माणसापासून सुरक्षित अंतर पाळत असतात. माणूस त्यांच्या जवळ आला तर ते स्वरक्षणासाठी हल्ला करतात. तरस हा श्वान प्रकारातील प्राणी आहे. त्याचबरोबर तरस जखमी असेल किंवा मादीसोबत पिल्लं असतील तरच ते माणसावर हल्ला करु शकते. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये असे आवाहन देखील वनक्षेत्रपाल रितेश नागोशे यांनी केले.

# प्रवीणा सावंतला १२ जुलैपर्यंत पोलीस कस्टडी

## दोन्ही आरोपींची मालमत्ता व बँक अकाऊंट गोठवण्याची नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । पेण**

जेएसडब्ल्यू कंपनीत नोकरी देण्याचे तसेच या कंपनीत ठेका मिळवून देण्याचा खोटा बनाव करुन आत्तापर्यंत जिल्ह्यातील ४३ तरुणांची ३१ लाख ७९ हजारांची फसवणूक केल्या प्रकरणी पेण येथील बंटी-बबली म्हणून कुप्रसिद्ध झालेल्या प्रवीणा सावंत व अतुल मांडवकर या जोडीला पेण न्यायालयाने पुन्हा दोन दिवसांची पोलीस कस्टडी वाढवली असून दोन्ही आरोपींची संपूर्ण मालमत्ता व बँक अकाउंट गोठवण्याची मागणी नागरिक करत आहेत.

पनवेल येथील फिर्यादी अजय पाटील यांनी पेण पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी नुसार, तालुक्यातील डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीत स्क्रॅपचा ठेका व कंपनीत विविध विभागात नोकरी मिळवून देतो असा खोटा बनाव करून एका राजकीय पक्षाची स्वयंघोषित नेत्या प्रविणा सावंत ( रा.गुरुकृपा सोसायटी,पेण) तसेच तिचा पेण येथील साथीदार अतुल मांडवकर या आटोपी गोळजोडीने जिल्ह्यातील ४३ तरुणांकडून प्रत्येकी ३० हजार ते १ लाख २० हजार रुपये घेऊन ३१ लाख ७९ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.

आरोपी प्रवीणा सावंत ही तिचा सा-थीदार अतुल मांडवकर यास जेएसडब्ल्यू कंपनीचा एच.आर.विभागातील अधिकारी म्हणून सांगत असत. आणि ज्या तरुणांना अधिकाऱ्याला भेटायचं असेल त्यावेळी आरोपी अतुल यास

.../२

# संक्षिप्त...

## मोबाईल चोरट्यास केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांपैकी एका गुन्हेगारास पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले असून, त्यांच्याकडून चोरीचा एक मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

पनवेल परिसरातील मीनाक्षी मोबाईल शॉपी मधून आरोपी रोहित दीपक पाटील (२४) रा. ठाणे व पाहिजे आरोपी ऋषिकेश चाचरे ( रा. ठाणे) या दोघांनी मिळून मोटारसायकलीवरून येऊन दोन महागडे मोबाईल पळून नेले होते. या यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पो. हवा. रवींद्र राऊत, पोना परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, विनोद देशमुख, रवींद्र पारधी, पोशी विवेक पारासुर व प्रसाद घरत आदींच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्त बातमीद्वाराकडून माहिती घेतली असता यातील एक आरोपी हा ठाणे परिसरात लपला आहे.

त्यानुसार त्या परिसरात सा-पळा रचून आरोपी रोहित पाटील याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीतील एक मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. तर दुसऱ्या फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

# करबुडव्या आर्शिया कंपनीवर जप्तीची नामुष्की

## साईच्या सरपंच अमृता सुनील तांडेल आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे होत आहे सर्वत्र कौतुक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या दशक भरात ग्रामपंचायतीचा कर न भरणाऱ्या मग्रूर अर्शिया वेअर हाऊसच्या मालमत्तेवर जप्ती आणण्यामध्ये साई ग्रामपंचायतीला यश प्राप्त झाले आहे.तब्बल ८ कोटी,७५ लाख, एकुणपन्नास हजार रुपयांच्या कर थकबाकीचे प्रकरण या वेअर हाऊस ने सन्माननीय उच्च न्यायालयात नेले होते. उच्च न्यायालयाने कंपनीला फटकारत साई ग्रामपंचायतीचे जप्तीचे आदेश मान्य केले. त्या आदेशानुरूप शुक्रवार दिनांक ८ जुलै रोजी अर्शीया कंपनीच्या दोन कलमार क्रेन,संगणक, टेबल खुर्च्या व अन्य कार्यालयीन साहित्याची जप्ती करण्यात आली आहे.

जप्तीची प्रक्रिया थांबविण्यासाठी अर्शिया प्रशास-नाने साम दाम दंड भेद यातील प्रत्येक नीतीचा अवलंब करून बघितला. परंतु सरपंच अमृता सुनील तांडेल यांच्या नेतृत्वाखालील कार्यरत बॉडीने कंपनी प्रशासना समोर पराकोटीचा संघर्ष करत असामान्य धैर्याचे उदाहरण प्रस्तुत केले. मित्तल ग्रुपच्या सगळ्या विरोधाला न जुमानता अशाप्रकारे जप्तीची प्रक्रिया करणारी साई ग्रामपंचायत ही रायगड जिल्ह्यातील पहिलीच ग्रामपंचायत ठरली असेल. मुजोर प्रशासनाला वठणीवर आणणाऱ्या अमृता सुनील तांडेल व त्यांच्या सहकाऱ्यांवरती स्तुती सुमनांचा वर्षाव होत आहे.

साई ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात आर्शिया नामक खासगी कंपनी(गोदाम) कार्यरत आहे. या कंपनीवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४ प्रमाणे आकारणी केलेली असून सन २०१२/१३ पासून सन २०२१/२२ पर्यंत मालमत्ता कराची रक्कम रुपये ८३३०४७४५/-,मागील घरपट्टी वरील ५१५ अन्वये दंड रू. ३७४६५६४/- व नोटीस फी ४९८१०९/- अशी एकूण रक्कम रुपये ८,७५,४९,२८/ ग्रामपंचायतीकडे भरणा केलेली नाही. कर व थकबाकी करीता ग्रामपंचायतीने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२९ प्रमाणे बिल व रीट नोटीस बजावण्यात आलेले आहेत परंतु आजतागायत कंपनीने मालमत्ता कराचा ग्रामपंचायतीकडे भरणा केलेली नाही.

कंपनीने ग्रामपंचायतीच्या बिलाविरुध्द उच्च न्यायालयात Writ petition no. 2103 (of 2019) दाखल केलेले आहे. तसेच ग्रामपंचायतीने थकबाकी वसूली करणे बाबत कार्यवाही करु नये म्हणून ०६/०३/२०२० रोजी माननिय उच्च न्यायालयाने अंतरीम आदेश दिले होते सदर आदेश दिनांक २०/०३/२०२० पर्यंत होते. परंतु दिनांक २०/०३/२०२० नंतर सदर अंतरीम आदेश चालू नाहीत, असे माननिय उच्च न्यायालयाने दिनांक १६/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये कळविले आहे. त्यामुळे सदरची रक्कम वसुल करणेकामी मुंबई ग्रामपंचायत (येणे असलेल्या रकमा वसुल करण्याबाबत) नियम १९६० मधील नियम ४ अन्वये जप्तीचा हुकुम (वॉरन्ट) बजावण्यात आले. नियम ४ प्रमाणे ग्रामपचायत सचिवाचे स्वाक्षरीने जप्ती हुकूम बजावण्यात आला व नियम ५ व ६ नुसार, कंपनी च्या दोन कलमार क्रेन, संगणक, टेबल, खुर्च्या व अन्य कार्यालयीन साहित्य जप्त करण्यात

.../२

# नांदगाव ते दिघेवाडी मार्गावरील पुलाला पडले जीवघेणे भगदाड

## ग्रामस्थांची दुरूस्तीची मागणी ; पुल बनला धोकादायक

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील नांदगाव ते दिघेवाडी रस्त्यावरील पुलाची दुरावस्था झाली आहे. या पुलाला मोठे भगदाड पडले आहे. स्थानिक ग्रामस्थांनी पुलाची पाहणी करून प्रशासनाकडे दुरूस्तीची मागणी केली आहे. हा पुल कमकुवत व धोकादायक झाला असून नागरिकांना जीव मुठीत घेऊन येथून प्रवास करावा लागत आहे. येथील दिघेवाडी, गोंडाळे, खरबाचीवाडी, हंडेवाडी अशा चार गावांना हा पुल जोडतो. या



पुलाला ३८ वर्ष झाली असून अनेक वर्ष याकडे सार्वजनिक बांधकाम विभागानचे दुर्लक्ष आहे. पावसाळ्या अगोदर या कमकुवत पुलाची डागडुजी देखील केली नसल्याने या पुलाला मोठे भगदाड पडले असून पुल कमकुवत व धोकादायक बनला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# रहिवाश्यांना तात्काळ मदत जाहीर करून या गावाच्या हितासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी

## आ.बाळाराम पाटील यांच्या मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी करण्यात आलेल्या भरावाच्या पाण्यामुळे पनवेल तालुक्यातील मौजे डुंगी, पारगाव, ओवळे व वडघर ही गावे पाण्याखाली गेल्याने येथील गावच्या रहिवाश्यांना तात्काळ मदत जाहीर करून या गावाच्या हितासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत आमदार बाळाराम पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ईमेलद्वारे निवेदन पाठविले आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी करण्यात आलेल्या भरावामुळे लगतच असलेली गावे ही खोलगट भागात गेल्याने दरवर्षीच्या पावसात मौजे ढुंगी, पारगाव व वडघर ही गावे भरावाच्या पाण्यामुळे पाण्याखाली जात आहेत. याचा येथील गाव-ाला फार मोठा फटका दरवेळीच्या पावसात बसत आहे. व रहिवास्यांना घरे सोडावी लागत आहेत. सर्व कुटुंबे ही रस्त्यावर येत आहेत. गावाच्या हितासाठी दरवर्षी पत्रव्यवहार तसेच नुकसान भरपाईसाठी पावसाळी अधिवेशन जुलै २०१८ मध्ये आमदार बाळाराम पाटील यांनी मागणी केली असता माजी नगरविकास राज्यमंत्री रणजित पाटील यांनी आश्वयसित केले होते. तसेच पावसाळी अधिवेशन जुलै २०१९ मध्ये देखील माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी देखील मदत जाहीर करून पूर्णवसन अथवा उपाययोजना करण्याच्या मागणीला मान्यता दिली होती. वेळोवळी पत्रव्यवहार, बैठका व अधिवेशनात मांडून सुध्दा

.../२

## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.साकोरे एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा.श्री.अजित भाऊ साकोरे यांना खालील वर्णनाची जमीन खरेदी करावयाची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे : माणगांव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड

| ७/१२ प्रमाणे जमीन मालकाचे नाव | भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.अल्ताफ अहमंद सफात अहमद शेख | ९३ | १-०२-४० पो.ख.०-२०-०० एकूण १-२२-४० | ९.१९ |
| | ८२ | ०-७८-२० पो.ख.०-०६-८० एकूण ०-८५-०० | ७.८७ |
| | ८६ | १-७०-२० पो.ख.०-१५-०० एकूण १-८८-२० | १४.८१ |
| | ८७ | ०-१७-०० पो.ख.०-०२-०० एकूण ०-१९-०० | ०.१९ |

तरी कोणीही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा अधिक संस्थांचे सदर जमीन मिळकती संबंधात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निम सरकारी, कंपनी बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क किंवा इतर कोणताही हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी हरकती कागदपत्रासह माझे खालील पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर शेत जमीन खरेदीखताने आमचे अशिलांचे नावे हस्तांतर करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०९/०७/२०२२

सही/-
अ‍ॅड.जी.एल.ठोनगे
बी.ए.एलएल.बी.
अ‍ॅडव्होकेट हायकोर्ट, मुंबई
१०५/१०९/३, हुजेरिया स्ट्रीट, मुंबई-४००००८
मो.नं.९८६९१७४४६०/८८९८६३२८८१

## जाहीर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, भूखंड मालक श्री.महेंद्र वल्लभदास शहा, रा.लाईन आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीच्या प.न.पा. हद्दीतील सिटी सर्व्हे क्रमांक १५५०/ब या भूखंडावरील त्यांनी बांधलेली जयरतन को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या इमारती खालील भूखंड व उर्वरित भूखंड मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची भूखंड मिळकत

| अनु क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | १५५० | ब | २९४.३ चौ.मी. | ३=६२ |

केवळ सदर भूखंड मिळकतीचे बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, गहाण, बक्षिसपत्र, साठेकरार, खरेदीविक्री-व्यवहार, अन्न, वस्त्र, पोटगी, कुळ, वहिवाट, विश्वस्त, दिवाबत्ती, जामिन, मुखत्यार, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य हस्तांतरण वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत खाली सही करणार यांच्याकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. सदर नोटीस ही उपरोक्त भूखंड मिळकतीचे टायटल हे निर्वेध व निर्जोखमी असल्याबाबत खात्री करणेकरिता हरकती मागविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकत व पुरावे न आलयास व सदर नोटीसीच्या मुदतीनंतर येणाऱ्या व या जाहिरातीच्या विरुद्ध वर्तमानपत्रात जाहीर केलेल्या पुरावे सुचना व हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी व सदर भूखंड मिळकतीचे टायटल हे निर्वेध व निर्जोखमी आहे असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०७/२०२२

सही/-
अ‍ॅड.श्री.सचिन मा.कल्याणकर
प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला, मिडल क्लास हौ.सो.लि., युनियन बँकेच्यावर, गांधी हॉस्पिटलच्या बाजूला, सुरूची हॉटेल समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटिसीद्वारे तमाम नागरिकांस कळविण्यात येते कि, मौजे टोकार्डे, ता. तळे, जि. रायगड येथील तळे तहसील दप्तरी मौजे टोकार्डे गाव नमुना ८ अ धारण नोंदवही खाते क्र. ५५ तसेच गाव नमुना ६ अ पत्रक अ. क्र. २९७ आणि अ. क्र. ४७४ मधील सर्व मिळकती ज्या वर्ग असून ७-१२ वर कब्जेदार सदरी भट कुटुबियांच्या वाली वारसांचे नावे नोंद आहे. त्या सर्व मिळकती भट कुटुंबियांचे मालकीच्या असून या मिळकतीचा खरेदी विक्री व्यवहार हा भट कुटुंबियांचे (आमचे) विश्वासू प्रतिनिधी श्री. किशोर गणेश वेदक, रा.तळा, ता.तळा, जि.रायगड यांनाच सन २०११ रोजी दिलेले आहेत. याकामी सर्व कायदेशीर अधिकार भट कुटुंबियांनी श्री.किशोर गणेश वेदक यांनाच दिले असले कारणे या करीता महसूल दप्तरी होणारा खर्च तसेच जाब जबाब, कोर्ट कचेऱ्यामंध्ये आमचे वतीने हजर राहून कामकाज पाहणे, वर्दी बुकावर सह्या करणे, अतिक्रमण हटविणे व कायदेशीर सर्व महसुली कामे स्वतः अखत्यारी श्री. किशोर गणेश वेदक यांनीच केले असून त्यांनाच आमचे उपरोक्त संदर्भ सर्व मिळकतींचा खरेदी विक्री व्यवहार घडवून देण्यासंदर्भात आम्ही भट कुटुंबियांचे वतीने संपूर्ण कायदेशीर अधिकार सन २०११ पासून दिले आहेत. त्याचप्रमाणे अन्य कोणत्याही व्यक्ती, व्यक्तींसोबत उपरोक्त मिळकती संदर्भात भट कुटुंबीयांनी कोणताही व्यवहार केलेला नाही तसे भट कुटुंबियांकडून उल्लंघनही होणार नाही. मात्र अन्य कोणत्याही व्यक्तींनी या संदर्भात परस्पर व्यवहार करण्याचा प्रयत्न किंवा व्यवहार केला असेल त्यास भट कुटुंबीयांची हरकत आहे. या शिवाय त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेत येवून त्यास परस्पर व्यवहार करणारे शासकीय दंडास शिक्षेस पात्र ठरतील. असे भट कुटुंबियांकडून या जाहीर नोटिसीद्वारे तमाम नागरिकांस कळविण्यात येत आहे.

सही/-
भट कुटुंबीय

मे.गुन्नाल साो.कोर्ट
**अ‍ॅड.दिनानाथ कै.सोनकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.९३१/२०२२
नि.नं.८/ड

१) श्रीमती.मलिका रामकृष्णन करुवत
वय : ५० वर्षे, व्यवसाय : काही नाही
२) कु.ग्रीष्मा रामकृष्णन करूवत
वय : ३० वर्षे, व्यवसाय :
दोघे रा.ई बिल्डींग रुम नं.१९, तिसरा मजला,
सचदेव नगर, सी / ब्लॉक रोड, दत्त मंदिराजवळ,
उल्हासनगर २, ठाणे, जिल्हा : ठाणे ४२१००२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.मलिका रामकृष्णन करुवत व अर्जदार क.२ कु.ग्रीष्मा रामकृष्णन करुवत, रा.ई बिल्डींग रुम नं.१९, तिसरा मजला, सचदेव नगर, सी / ब्लॉक रोड, दत्त मंदिराजवळ, उल्हासनगर २, ठाणे, जिल्हा : ठाणे ४२१००२ अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै.रामकृष्णन करप्पन करूवाथ @ करूवत हे दि.०४/०६/२०२१ रोजी रिजनल केंसर सेंटर हॉस्पिटल, तिरुवनंतपुरम येथे मयत झाले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्रं.३०४, तिसरा मजला, विघ्नहर रेसिडेंन्सी, प्लॉट नं.४८, सेक्टर ५ ए, करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, ४१०२०६. क्षेत्रफळ ४४.९७ चौ.मीटर बिल्टअप एकूण किंमत रु.२०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध, अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# माथेरान मधील पेव्हर ब्लॉक रस्त्यांची साफसफाई सुरू



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये पावसाळ्यात पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना शेवाळ येत असल्याने त्यावरून चालणे कठीण होते,प्रसंगी अपघात होण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही याकामी नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी हा सुद्धा एक आपत्ती व्यवस्थापनाचाच भाग म्हणून आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना देत पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांवर ब्लिचिंग पावडर टाकून स्वच्छ करण्यासाठी सुरुवात करण्यात आली आहे.

गावातील ह्या रस्त्यांवर अनेकदा स्थानिक रहिवाशी उन्हाळ्यात कपडे धुतल्यावर वेस्टेज पाणी टाकत असतात तर काही ठिकाणी काही घरातील बाथरूमचे पाणी सुध्दा रस्त्यांवर येत असते. त्यामुळे ह्या रस्त्यांची अवस्था खूपच बिकट होत असते उन्हाळ्यात जरी या बाबतीत काही त्रास जाणवत नसला तरी पावसाळ्यात ह्या रस्त्यांना या वेस्टेज पाण्यामुळे शेवाळ येत असते त्यामुळे हे पेव्हर ब्लॉकचे रस्ते चिकट होऊन त्यावरून घसरून पडण्याची दाट शक्यता असते.यासाठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांनी विविध भागातील रस्त्यांवर ब्लिचिंग पावडर टाकून ते स्वच्छ करण्यासाठी सुरुवात झाली आहे.

# पिस्तूल बाळगणाऱ्या एकाला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पिस्तूल बाळगणाऱ्या एका व्यक्तीस गुन्हे शाखा कक्ष ३ ने अटक केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आरोपी जावेद जाहिद खान यांच्याविरोधात गुहा दाखल करण्यात आला आहे.

खारघर वसाहतीमधील गुरुद्वार ते पापडीचा पाडा कडे जाणाऱ्या रस्त्यावर तळोजा जेल कमानीच्या परिसरातील बस स्टॉप जवळ एकजण बेकायदेशीर पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस नाईक संजय फुलकर यांना मिळाली होती.

त्यानुसार वपोनि शत्रूघ्न माळी आणि त्यांच्या पथकाने त्या ठिकाणी सापळा रचून कारवाई केली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : पेण, ता.पेण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे विकसनाचे संपूर्ण हक्क व अधिकार माझे अशिल मे.श्री सिद्धीविनायक रियालिटी तर्फे भागीदार श्री.जितेंद्र गुरुनाथ शेळके, श्री.एकनाथ गणपत शेळके, महेंद्र पंढरीनाथ शेळके व हनुमान गणपत शेळके हे विकसनासाठी घेत आहेत. सदर भूखंडाचे / मिळकतीचे वर्णन व विद्यमान कब्जेदाराचे नावे खालीलप्रमाणे :-

**भूखंडाचे वर्णन**

**मौजे : पेण, ता.पेण, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नाव | प्लॉट नं. | भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| सौ.छाया श्रीधर पाटील | ०२ | २७० | ५ | १५० चौ.मी. |

वरील मिळकतीचे विकसित करण्याचे सर्व हक्क भोगवटादार यांचकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी घेण्याचे ठरविले आहे. तरी मिळकतीचे बाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, लीन, पोटगी, विक्री करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विकसनाचा करार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०८/०७/२०२२

सही/-
अ‍ॅड.निलेश एकनाथ शेळके
शिवनेरी कॉम्प्लेक्स, रुम नं.९, सेक्टर ४ ए, प्लॉट नं.१२, नाईके हॉस्पिटल जवळ, आसुडगाव, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८८९८६१३१८८

## जाहीर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री.विजय गोविंद कासले, रा.मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड यांचे मालकी, ताबाकब्जा व वहिवाटीची मौजे : उसर्ली खुर्द येथील जुना सर्व्हे क्र.१९, हिस्सा क्र.४/१, नवीन सर्व्हे क्र.१९, हिस्सा क्र.४/अ मधील ग्रामपंचायत हद्दीमधील घरजमीन मिळकत क्र.६०९, मधील बांधकाम क्षेत्र ३३'×२६' फुट, बांधीव क्षेत्र ८५८.०० चौ.फूट इतक्या क्षेत्रफळाच्या राहत्या घरासहीत व आजूबाजूला असलेल्या मोकळ्या जागेसहीत (२) दोन गुंठे क्षेत्रफळाची घरजमीन मिळकत आमचे अशिलांना बांधकामाद्वारे विकसन करण्यासाठी दिलेले असून त्या अनुषंगाने घरजमीन मालक व विकासक यांचेमध्ये विकसनाकरिता ''प्रारंभिक विकसन करार'' झालेला आहे.

सदर मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, गहाण, दान, जामिन, बक्षिस, साठेखत, पोटगी, खरेदी-विक्री व्यवहार, कुळ, वहिवाट, दिवाबत्ती, विश्वस्त, लायसन्स, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य हस्तांतरण इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती न आल्यास वरील घर जमीन मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल हे सदर मिळकतीच्या उपरोक्त मालकांबरोबर विकसनाकरिता नोंदणीकृत ''विकसन करार'' करतील व सदर नोटीसीच्या मुदतीनंतर येणाऱ्या व जाहिरातीच्या विरुद्ध वर्तमान पत्रात जाहीर केलेल्या कोणत्याही सुचना व हरकती, आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

दि.१०/०७/२०२२

सही/-
अ‍ॅड.श्री.सचिन मा.कल्याणकर
प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला, मिडल क्लास हौ.सो.लि., युनियन बँकेच्यावर, गांधी हॉस्पिटलच्या बाजूला, सुरूची हॉटेल समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५

मा.सोनावणे साो
**अर्जदारातर्फे वकील**
**विवेक सदाशिव तावडे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९२१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०८/२०२२

१) श्री.विलास गुरुनाथ पाटील
वय : ४५, व्यवसाय : शेती
२) श्री.विजय गुरुनाथ पाटील
वय : ४१, व्यवसाय : शेती
३) श्री.किरण गुरुनाथ पाटील
वय : ३९, व्यवसाय : शेती
सर्व रा.मु.डुंगी, पो.पारगाव,
उरण पनवेल रोड, जिल्हा : रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै.विमल गुरुनाथ पाटील यांचे निधन दि.१४/०३/२०२१ रोजी मुक्काम : डुंगी, पोस्ट : पारगाव, उरण पनवेल रोड, जिल्हा : रायगड येथे झाले आणि अर्जदार १) श्री.विलास गुरुनाथ पाटील, वय : ४५, २) श्री.विजय गुरुनाथ पाटील, वय : ४१, ३) श्री.किरण गुरुनाथ पाटील, वय : ३९, सर्व रा.मुक्काम : डुंगी, पोस्ट : पारगाव, उरण पनवेल रोड, जिल्हा : रायगड यांनी या कोर्टात सदर मयत विमल गुरुनाथ पाटील यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणातील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरित होणाऱ्या निवासी / वाणिज्यक / मिश्र वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी भूखंडाचे वाटप पत्र क्र.सिडको/अवित/पुनःस्थापना/२०१५/४३४/PAD-151 दिनांक ३०/०६/२०१५ नुसार**

**प्लॉट नंबर १२४, सेक्टर ३, ''पुष्पकनगर'', दापोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६**

कै.विमल गुरुनाथ पाटील यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यनिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बोर्लीपंचतन शहराच्या मुख्य रस्त्याला वाली कोण? ; ग्रामस्थांचा संतप्त सवाल

दुरवस्थेत वाढ झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांना रस्त्याने मार्ग काढताना चांगलीच कसरत करावी लागते. या रस्त्यांवरून जीव मुठीत घेऊनच मार्गक्रमण करावे लागते. किंबहुना अनोळखी वाहन चालकाला अचानक खड्ड्यात अपटल्याने मोठे नुकसान सोसावे लागत आहे. अशा जीवघेण्या खड्यांमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## प्रवीणा सावंतला १२ जुलैपर्यंत पोलीस कस्टडी

कंपनीच्या गेटवर उभा करून विश्वास संपादन करत असत. मात्र अनेक महिने नोकरी व ठेका मिळत नसल्याने सदर फिर्यादीने पेण पोलीस स्टेशन गाठत तक्रार दाखल केली असता गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपींना आज पुन्हा न्यायालयात हजर केले असता या आरोपी जोडगोळीला १२ जुलै पर्यंतची पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे. सदर प्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सहाय्यक पोलीस निरीक्षक पी.टी.काळे हे करीत आहेत. या फसवणूक प्रकरणातील दोन्ही आरोपींची संपूर्ण मालमत्ता व बँक अकाउंट गोठवण्याची मागणी फिर्यादीचे कुटुंब व पेण तालुक्यातील जनता करत असून या प्रकरणात पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आणखी कुणाची या जोडीने फसवणूक केली असल्यास स्थानिक पोलीस स्टेशनला लेखी तक्रार देण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## करबुडव्या आर्शिया कंपनीवर जप्तीची नामुष्की

आले आहे. याबाबत अधिक माहिती देताना साई ग्रामपंचायतीच्या सरपंच अमृता सुनील तांडेल म्हणाल्या की, २७ जून रोजी जप्तीची कारवाई करण्याचे बाबत आम्ही कंपनीला नोटीस दिली होती. परंतु कंपनी प्रशासनाने पुन्हा एकदा सन्माननीय उच्च न्यायालयात धाव घेत वेळकाढू पणाचे धोरण अवलंबले. यावेळी सुनावणीपूर्वी थकीत कराची २५% रक्कम भरण्यास उच्च न्यायालयाने कंपनीला आदेश दिले होते. परंतु पुन्हा एकदा कंपनीने पैसे नसल्याचा कांगावा करत आपला युक्तिवाद केला. यावेळी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कंपनीला फटकार लगावत जप्तीचे आदेश कायम ठेवले. त्यानुरूप शुक्रवार दिनांक ८ जुलै रोजी जप्तीची कारवाई करण्यात आली. जप्तीच्या कारवाईच्या वेळेस सरपंच अमृता सुनील तांडेल, उपसरपंच हिरामण मोकल, विस्तार अधिकारी विश्वास म्हात्रे,विस्तार अधिकारी अविनाश घरत, पनवेल पंचायत समिती सदस्य नाना मोरे, ग्रामविकास अधिकारी तथा सचिव बबन राठोड , सुनील तांडेल,अनिल तांडेल,सदस्य अविनाश मोकल, बेबीताई आत्माराम मोकल, अनुसया वाघमारे, स्वाती मोकल, करुणा प्रवीण मोकल, सुजित शंकर पाटील तसेच आकाश मोकल,राजा मोकल,विजय मोकल,संकेत मोकल आदी उपस्थित होते.

पोलीस बंदोबस्त मिळण्यास विलंब झाल्यामुळे सकाळी ११ वाजता सुरू होणारी जप्तीची कारवाई साधारणपणे संध्याकाळी चार वाजता सुरू झाली. कारवाई मध्ये बाधा आणण्यासाठी सिक्युरिटी चिफने जंग-जंग पछाडले. जप्तीची कारवाई कव्हर करण्यासाठी आलेल्या जेष्ठ श्रेष्ठ पत्रकारांना आत मध्ये जाण्यापासून मज्जाव देखील करण्यात आला. जप्तीची कारवाई होऊ नये यासाठी कंपनी प्रशासनाने कंपनीत कामाला असलेल्या ग्रामस्थांना कंपनी बंद होणार असल्याची आवई उठवत ग्रामस्थांच्यात भांडण लावून देण्याचा अत्यंत अश्लाघ्य प्रकार देखील करून बघितला.अखेरीस सत्याचा विजय झाला आहे. अशाप्रकारे मुजोर कंपनी प्रशासनाला नामोहरम करण्याची किमया साई ग्रामपंचायतीने करून दाखवली आहे. या स्वरूपाची कारवाई करणारी साई ग्रामपंचायत ही कदाचित जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत असेल. सरपंच अमृता सुनील तांडेल व त्यांच्या तमाम सहकार्यांवर, संघर्षमय पद्धतीने कंपनीला झुकवल्याबद्दल अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## रहिवाश्यांना तात्काळ मदत जाहीर करून या गावाच्या हितासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी

आजतगायत सदरील गावांना या भरावाच्या पाण्यामुळे होणाऱ्या नुकसानी व बेघर होण्याच्या त्रासापासून वाचविण्याच्या दृष्टिने आणि या गावांत पूरपरिस्थिती निर्माण होवू नये यासाठी कोणतीही उपाययोजना केली गेली नाही. परिणामी यावर्षीच्या पावसाने पुनश्च एकदा गावावर पूराचे संकट ओढावलेले असून तात्काळ येथील रहिवाश्यांना व पनवेल तालुक्यात इतरस्थ गावांमध्ये पुरामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई व मदत जाहिर करण्यात यावी. तसेच सदर रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. आणि या गावाच्या हितासाठी आणि पुन्हा या गावावर असे सकंट येवू नये, याकरीता उपाय योजना करणेसाठी लवकरात लवकर आपल्या अध्यक्षतेखाली येथील रहिवाशी, स्वतः आमदार आणि सिडको अधिकारी तसेच संबंधित सर्व पदाअधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन आमदार बाळाराम पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ईमेलद्वारे पाठवले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बोर्ली ग्रामपंचायतीत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत व रेवदंडा येथील सुप्रसिध्द कै.लिनता बन्सिधर रेळे ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

बोर्ली ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, सदस्य गणेश कट, सुनील पाटील,कै.सौ.लिनता बन्सिधर रेळे ट्रस्ट चे नेत्रतज्ञ डॉ.साहिल म्हात्रे, आरोग्य सेवक सचिन पोटफोडे, समिधा शेणवईकर, मान्यवर, कर्मचारी वृंद, ग्रामस्थ व महिला यावेळी उपस्थित होते.

ग्रामपंचायतीतर्फे गावाच्या विकासासाठी अनेकविध उपक्रम राबविण्यात येतात.त्याचाच भाग ग्रामपंचायत कार्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी कै. सौ.लिनता बन्सिधर रेळे ट्रस्टचे नेत्रतज्ञ डॉ.साहिल म्हात्रे यांच्या टिमने बोर्ली,सुरई व ताराबंदर परीसरातील लोकांची नेत्रतपासणी, केली तसेच रुग्णांची शुगर व रक्त तपासणी करण्यात आली. याचा परीसरातील लोकांनी लाभ घेतला. नेत्र तपासणीत तेरा जणांना मोतीबिंदू झाल्याचे आढळून आले. त्यांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियासाठी ट्रस्टतर्फे मुंबई - परळ येथील हाजी बच्चूभाई हॉस्पिटलमध्ये नेण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## बीड ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सपना लोभी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील बीड ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सपना रवी लोभी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी त्यांचे अभिनंदन करताना तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा रंजना धुळे, बीड ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रभावती लोभी, माजी उपसरपंच वैशाली देशमुख, शैला बेलोसे, दीपा कदम, जगदीश देशमुख, केतन बेलोसे आदी उपस्थित होते.

# सुधागडातील रस्त्यांना अच्छे दिन कधी येणार?

## जागोजागी रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य ; अपघाती घटनांत वाढ

**दै.रायगड नगरी । पार्ली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. येथील डोंगर दर्याखोर्‍यात माळरान, पठारावर विकासाची किरणे पोहचली नाहीत. कोणत्याही विकासाचे मूल्यमापन तेथील रस्त्यांच्या प्रगतीवरून केले जाते मात्र येथील रस्त्याची अक्षरश दुर्दशा झाल्याचे चित्र दिसून येते. सुधागडातील रस्त्यांची पहिल्याच पावसात भयानक अशी अवस्था झालेली पाहायला मिळत आहे. पाली खोपोली वाकण राज्य महामार्ग असेल, सार्वजनिक बांधकाम खात्याचे रस्ते असतील,जिल्हा परिषदेचे रस्ते असतील किंवा मुख्यमंत्री ग्रामसडक अंतर्गत रस्ते असतील, या रस्त्यांनी पहिल्याच पावसात दम तोडला असून रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरून रस्त्यांची अक्षरशः दाणादाण झालेली बघायला मिळत आहे.

पाली खोपोली राज्य महामार्गावर मिरकूटवाडी च्या पुलाजवळ रस्त्याला भला मोठा खड्डा पडला होता रस्त्याला तलावाचे स्वरूप आले होते. या ठिकाणी वाहनचालकांना रस्त्याचा शोध घेत



खड्ड्यातून मार्ग काढावा लागत आहे. यामध्ये वाहनांचे मोठे नुकसान होत असून महागड्या गाड्या नादुरुस्त होत आहेत. परंतु सध्या तात्पुरत्या स्वरूपात त्याठिकाणी जीएसबी मटेरियल टाकून ते सुस्थितीत करण्यात आले आहे. बेजबाबदार प्रशासन व मुजोर ठेकेदार डोळ्यावर पट्टी बांधून बसले आहेत. एकंदरीत संबंधित प्रशासन ठेकेदाराला जावई बनवितात की काय असे देखील वाटू लागल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

अशीच काहीशी परिस्थिती रासळ गावाजवळ झाली आहे. रासल गावाजवळ महामार्गाचे काम अपुरे असल्यामुळे एकेरी वाहतूक चालू आहे तसेच वाहतूक चालू असलेली बाजू पूर्णतः पाण्याखाली आहे त्यामुळे वाहनचालकांना त्यामधून मार्ग काढताना अडचणी निर्माण होत आहेत. त्या ठिकाणी अपघात होण्याची देखील दाट शक्यता आहे.

उन्हाळ्यामध्ये झालेली रस्त्यांची कामे ही निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे सगळीकडे पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायत अंतर्गत झालेले रस्ते यांची देखील दुरवस्था झाली आहे. नुकताच झालेला खुरावले फाटा ते वाघोशी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा बोजवारा वाजला आहे. रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. खुरावले फाटा ते वाघोशी दरम्यान रस्त्याला जागोजागी खड्डे पडेल असून खड्ड्यांमधील खडी, माती अन्य मटेरियल बाहेर रस्त्यावर अस्थाव्यस्थ पडले आहे. यामुळे अपघाती घटनांना प्रत्येक्ष अप्रत्येक्ष चालना मिळते आहे.

पाली हे सुधागड तालुक्याचे मुख्यालयाचे ठिकाण असल्यामुळे पाली याठिकाणी शासकीय निमशासकीय कामानिमित्तमोठ्या संख्येने नागरिक येत असतात. पाली येथे पाली बस स्थानक आहे. मिनिडोअर स्थानक आहे. पालीहून ठाणे, मुंबई, पुणे,पेण, महाड, खोपोली आदी ठिकाणी जाता येत असल्यामुळे वाहनांची रहदारी जास्त आहे. तसेच पाली हे अष्टविनायकांपैकी एक बल्लाळेश्वराचे ठिकाण असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातुन भाविक दर्शनासाठी येत असतात. परंतु अशा मुख्यालयाच्या तसेच नगरपंचायतीच्या हद्दीतील रस्ते देखील खड्डेमय झाले आहेत. रस्त्यावरून वाहन चालवताना खड्डेमय रस्त्यामुळे नागरीकांचा विचार करून वाहन चालवावे लागते. त्यामुळे आता खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डे हे कळेनासे झाले आहे.

## गुरुपौर्णिमे निमित्त चिरनेर ते वहाळ श्री साईबाबांची पायी पालखी दिंडी सोहळा

**दै.रायगड नगरी । उरण**

१३ जुलै २०२२ रोजी हिंदू धर्मातील प्रसिद्ध सणापैकी एक असलेले गुरुपौर्णिमा हा सण आहे. या गुरुपौर्णिमा सणाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याहि वर्षी साई सेवा मंडळ चिरनेर तर्फे श्री महागणपती मंदिर चिरनेर ते श्री साई मंदिर वहाळ दरम्यान श्री साईबाबाची पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री महागणपती मंदिर चिरनेर येथून वारकरी दिंडी पदयात्रा दि १३ जुलै २०२२ रोजी दुपारी १२ वा. श्रीची आरती करून साई मंदिर वहाळ येथे प्रस्थान होणार आहे. यंदाचे हे पदयात्रेचे ७ वे वर्ष आहे.सदर पदयात्रा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे कार्याध्यक्ष गजानन फुंडेकर, अध्यक्ष अमित मुंबईकर, सचिव संतोष चिर्लेकर, खजिनदार प्रसाद पाटील, सल्लागार बबन ठाकूर, गजानन म्हात्रे, हरिश्चंद्र मोकल, रमेश म्हात्रे यांच्यासह साई सेवा मंडळ चिरनेरचे सर्व पदाधिकारी सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

तरी सर्व साईभक्तांनी दिंडी मध्ये सहभागी होउन श्री साईचा कृपाशिर्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी, दिंडी मध्ये सहभागी होण्यासाठी अध्यक्ष अमित मुंबईकर फोन नंबर ८४५२९३७३८२, उपाध्यक्ष नितिन नारंगीकर ८४५४९३७९६६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे प्रस्तावित मालक १) कृष्णा बापू पाटील, २) कुडलिक उर्फ पुंडलिक बापू पाटील, ३) जनार्दन बापू पाटील, ४) दशरथ बापू पाटील, ५) नामीबाई उर्फ नर्मदा बळीराम पाटील यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरले आहे. सदरहू जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**

| क्र. व उपविभाग | भोगवटा वर्ग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३५/२ | १ | ००.४६.०० | १-०५-० |

येणेप्रमाणे जमीन मिळकत आहे. वर नमूद जमीन मिळकतीमध्ये वा मिळकतीपैकी कोणत्याही भागावर कोणीही व्यक्तीचे कसल्याही प्रकरचे करार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, खत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे.

वरील विहित मुदतीत कोणाकडून कसल्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्बंध व बोजरहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकती बाबतचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती, तक्रारी, दावे हे रद्दबातल आहेत. त्या विचारार्थ ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.०८/०७/२०२२

सही/-
**ॲड.अवंतिका भ. देशेकर**
**यशोकिरण सोसा. ऑफिस नं.१३, लोखंडीपाडा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९३२४०५८५१६**

# पाऊस चांगला पडतोय पण थांबेनासा झाला कि मात्र धडकी भरतेय : बळीराजा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

सध्या पाऊस चांगला पडतोय शेतीच्या कामांना वेग आला आहे. लावणीची काम सुरु आहेत. सगळी कडचे माळरान हिरवाईने नटले आहेत. शेतीचे सुंदर चौरसाकार आवणाचे तुकडे शेतांकडे लक्ष वेधतात, नांगरधारी बळीराजा आपल्या सर्जा राजा ला हाकत, ईरली घोंगडी डोईवर घालुन शेतीत लावणीची काम करुन अथक कष्ट करत बांधावर घरची मिठभाकर खात, काही क्षण विसाव्याला बसलेला शेतकरी, मजुर, महिला अस मनोहारी दृष्य मनाला समाधान देत आहे. असाच पडत राहिला तर शेती चांगली बहरेल, अस बळीराजाच म्हणन आहे.

अलिकडच्या एक दोन वर्षात फारसा चांगला अनुभव गाठीला नाही. वादळ वारा पूर विजा भूस्खलन झाली आपत्ती आली, सार निसर्गाच्या स्वाधिन आहे. अशा प्रतिकुलतेत शेती करण्याकडचा कल काहिसा रोडावला आहे. अनेकांनी शेती करणे सोडले हे कटू सत्य आहे.

अशातच महागाईचे चटके आधुनिक शेती करणे खिशाला परवडणारे नाही. मजुरी गगनाला भिडली आहे. लाईट बिलाचे ओझे सतावते आहे. खते, बियाणे, मजुरी सगळ सगळं महागल, परवडत नाही. पण इकडे कोकणात दूसरा पर्याय देखिल नाही. घरचा भात, भाजीपाला, रानभाज्या, ताजी मासोळी, फक्त विकतच तेवढ मिठ मसाला तेल आणि अलिकडे धूर नको म्हणुन गॅस पण तो आता परवडत नाही. शेवटी लाकुडफाटा आणि चूल फूंकणे आलेच. असो तरीही यंदा आदिवासी बळीराजा खुशीत आहे.

एकदम नदि नाल्यांना पूर आला नाही तरी नदी नाले शेत पाण्याने भरली. भरपूर मासे वल्गणीला मारले, विकले, चार पैसे कनवटीला आले. पण वाढती महागाईने खिशात दमडी शिल्लक राहत नाही.

गतवर्षातील पूराचे थैमान आजही अनेकांच्या मनात घोंगावते आहे. यातु-नही महाडकर मंडळी स्थिरावल्याचे आपण रायगडवासिय अनुभवत आहोत. जिल्हा शासनाचे प्रयत्न, पूर्वतयारी यंदा पावसाळ्याच्या सुरुवाती पासुनच दिसून आली आहे. राज्य शासनानेही तत्परता दाखवली आहे. एनडिआरएफ पथकं, आपली स्थानिक युवापिढी साळूंखे रेस्क्यु टीम सारखी जाँबाज पथक दिमतीला आहेतच.

एकंदरीत निसर्गाची कृपा झाली तर यंदाचा पावसाळा सुखावणारा असेल. अस बोलल जात आहे. निसर्ग पर्यटनाला देखिल सुगीचे दिवस मात्र प्रशासनाने धाक ठेवला आहे. कारण निसर्ग धबधबे, तलाव, नदी परिसरात नको इतके धाडस कोणी करु नये हा उद्देश आहे. तरिही काहीजण अपवादात्मक कृत्य करतातच आणि सार्‍यांचा आनंद हिरावतात. एखादी दुर्घटना घडली कि त्यामुळे सर्वांना भो-गावे लागते. काळजी घेतली तर आनंद लुटण्यास मज्जाव नाही. अजुनही दोन महिने काळजीचे आहेत. कारण निसर्ग लहरी असल्याचा अनुभव येत आहे. एकंदरीत रायगडात एखाद दूसरी अतिवृष्टी मुळे झालेली घटना वगळता पाऊस बरा पडत असल्याची प्रतिक्रिया सर्वच भागातून ऐकावयास मिळत आहे.

# रोह्यात प्रांताधिकारी नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

**दै.रायगड नगरी । रोहा**

मागील तीन महिन्यांपासून प्रांताधिकारी यांची जागा रिकामी आहे. तत्कालीन प्रांताधिकारी यशवंत माने यांची पुणे जिल्ह्यात बदली झाली. तीन महिन्यांपासून रोहा प्रांताधिकारी जागी कोणाचीही नियुक्ती नाही.

दहावी, बारावी निकाल जाहीर झाले असून पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कागदपत्राची आवश्यकता आहे. कागदपत्रांशिवाय पुढील ऑनलाईन अभ्यासक्रमाची नोंदणी होत नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे. वैद्यकिय तसेच अभियांत्रिकीय प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मात्र चकरा मारुन देखील प्रमाणपत्र मिळत नसल्याचे विद्यार्थ्यांची हिरमोड होत आहे. कागदपत्रे काढण्यासाठी विद्यार्थी प्रांताधिकारी कार्यालयात चकरा मारत आहे. मात्र विद्यार्थ्यांना कागदपत्रे मिळण्यास उशीर होत असल्याने विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. विविध शालेय अभ्यासक्रमासाठी नोंदणी मुदतीत करावयाच असल्याने विद्यार्थ्यांचीही कागदपत्रासाठी धावपळ होत आहे. प्रलंबित दाखल्यांसाठी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी रोहा तहसील कार्यालयात तळ ठोकल्याचे दृष्य दिसते आहे.

**मे.मुजावर सो**

**प्रो.जमा.६-२५** — **अर्जदाराचे वकील ॲड.तुषार एल. सोंडकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०८/२०२२

१) श्रीमती.सुधा धर्मराजन कोलतोट (पत्नी)
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बिल्डींग नं.४, रुम नं.१०२, स्वागत कॉम्प्लेक्स, पालीदेवद, जरी मरी मंदिर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
२) श्री.सुदर्शन धर्मराजन कोलतोट (मुलगा)
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी.३, रुम नं.२००, चित्तरंजन नगर, राजावाडी हॉस्पिटल, घाटकोपर ईस्ट, मुंबई ४०००७७
३) श्री.सुरज धर्मराजन कोलतोट (मुलगा)
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बिल्डींग नं.४, रुम नं.१०२, स्वागत कॉम्प्लेक्स, पालीदेवद, जरी मरी मंदिर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.के.धर्मराजन हे दि.३१/१०/२०१४ रोजी रा.नील हॉस्पिटल जवळ, सेक्टर १, नवीन पनवेल येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई कै.लक्ष्मी अम्मा या सन अंदाजे १९७६ रोजी मयत झाल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**१) रा.सदनिका नं.१०२, पहिला मजला, बिल्डींग नं.४, स्वागत कॉम्प्लेक्स, पाली देवद, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्र ५८० चौ.फूट (बांधीव एरिया)**

कै.के.धर्मराजन यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आ-हेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड - करंजाडे | | | | | | | | |
| १ | १२ कामोठे | कामोठे ३० | ४/१<br>५/२अ<br>६/२/२क | ०-१४-१<br>०-०२-०<br>०-२४-० | ८०० चौ.मी. पैकी ४०० चौ.मी. | मौजे-कामोठे, भूखंड क्र. ५८, सेक्टर-६A, क्षेत्र-३९९.५३ चौ.मी. | **मा. न्यायालयीन रे.मु.क्र. २०८/२००६ नुसार व वारसदाखल्यानुसार भूधारक कै. नारायण सिताराम म्हात्रे व कै. ठकीबाई नारायण म्हात्रे यांचे वारस**<br>१) श्री. जनार्दन नारायण म्हात्रे<br>२) श्री. मनोहर नारायण म्हात्रे<br>३) श्री. चंद्रकांत नारायण म्हात्रे<br>४) श्रीमती तारा भानुदास मयेकर<br>५) श्रीमती मंदा वामन केणी<br>६) श्रीमती कुंदा प्रभाकर येंदारकर | निरंक |
| | | कामोठे ३१ | ७/६ | ०-४९-१ | | | | |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | ०-८९-२ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. तसेच सदर हरकत अर्ज हे aclso.thane@cidcoindia.com या ईमेल वर सादर करावे. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१४९/२०२२-२३


**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डिंग, तळमजला, कामत आळी, सतक्रार प्रेस समोर, ता. अलिबाग, जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१ - २२२०१३ ईमेल ddr_rgd@rediffmail.com**

**महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिका बाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये अर्ज मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कव्हेंयन्स बाबत)**

**जाहीर नोटीस**

अर्जदार अंबर अपार्टमेंट सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. फायनल प्लॉट क्र. ४३ सी. टी. एस. नं. ३३४ ऐ व ३३४ - बी-,टी. पी.एस. स्कीम नं १ पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड, यांनी गैर अर्जदार १) बांधकामदार शेठ अँड भारमल, २११/१७, नागदेवी स्ट्रीट, जमाल बिल्डिंग, दुसरा मजला, मुंबई ४००००३ २) श्री. हिरालाल विरचंद शेठ, (जागा मालक), ३) श्री. फक्रुद्दीन अब्दुलहुसेन भारमल, ४) श्री. जितेंद्रकुमार हिरालाल शेठ ५) श्री. राजेंद्रकुमार हिरालाल शेठ ६) शेठ फॅमिली ट्रस्ट - ट्रस्टी ७) अन्वर सेटलमेंट ट्रस्ट ट्रस्टी तायबअली हसनअली ८) श्री. कुतुबुद्दीन भारमल वरील २ ते ८ (सर्व जागा मालक) रा. कच्छी मोहल्ला पनवेल ता. पनवेल जि. रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**पनवेल महानगर पालिका हद्दीतील पनवेल जि. रायगड येथील फायनल प्लॉट नं. ४३, सिटी सर्वे नं. ३३४ ए आणि ३३४- बी एकूण क्षेत्र १३६५ चौ. मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत गैर अर्जदार यांना नोटीस बजावणी झाली नाही. त्यांचे पोस्टाचे पाकीट अपूर्ण पत्ता असा शेरा घेऊन परत आले आहे. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना या नोटिसीद्वारे कळविण्यात येते कि, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करून देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक ०३/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०७/२०२२

सही/-
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

# संक्षिप्त...

## प्राचार्या इंदुमती घरत यांचे अल्पशा आजाराने निधन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या इंदुमती बाळाराम घरत यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले.

अत्यंत मनमिळावू स्वभाव आणि विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणाऱ्या तसेच शैक्षणिक क्षेत्रासह सामाजीक क्षेत्रातही सक्रीय असलेल्या इंदुमती घरत यांच्या अचानक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्या ५७ वर्षाच्या होत्या. त्याच्या पार्थिवावर पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभुमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहत त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## भरधाव कंटनेर ट्रेलरने दिलेल्या धडकेत मोटारसायकल चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव कंटनेर ट्रेलरने दिलेल्या धडकेत मोटारसायकल चालकाचा मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना कळंबोली सर्कल येथे घडली आहे. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी कंटनेर ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले आहे.

विमलेश रामअवतार शर्मा (४०) असे या अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव असून राधेश्याम जगदीश (३५) असे जखमीचे नाव आहे. विमलेश आणि राधेश्याम हे दोघे मोटारसायकलवरून जात असताना कळंबोली सर्कल येथे पाठीमागून भरधाव येणाऱ्या कंटेनरने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली.

यात दोघे गंभीर जखमी झाल्याने दोघांना एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान, विमलेश याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी कंटेनर ट्रेलर चालक अजय जाधव (२८) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# सहाय्यक पोलीस निरीक्षकाला शिवीगाळ व धक्काबुक्की

## आरोपी नवनाथ घरतला अटक ; २७ जुलै पर्यंत न्यायालयीन कोठडी

**दै.रायगड नगरी । पेण**

गणपतीचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या जोहे गावातील अरुंद रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंग केलेला टेम्पो काढण्यासाठी सांगितल्याचा राग येऊन आरोपी नवनाथ घरत याने दादर सागरी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकालाच धक्काबुक्की व शिवीगाळ केल्याची घटना तालुक्यातील जोहे येथे घडली. सदर आरोपीला १९ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.


या बाबत सविस्तर वृत्त असे कि, गणपतीचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या जोहे गावात सध्या गणपती मूर्ती घेऊन जाण्यासाठी खूपच गर्दी असते व सदर रस्त्यावर वाहतूक कोंडी ही होत असते. मात्र याच जोहे गावातील पोलीस स्टेशन शेजारील रस्त्यावर आरोपी नवनाथ प्रल्हाद घरत ( वय ३४ ) रा.जोहे,पेण याने आपल्या ताब्यातील ( क्र. MH 06 BW 3959) क्रमांकाचा आयशर टेम्पो नेहमीच अरुंद रस्त्यावर लावत होता. हा टेम्पो दादर सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी रस्त्यातून बाजूला घेण्यास सांगितला असता या गोष्टीचा राग येऊन आरोपी नवनाथ घरत याने त्यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. आणि या घटनेनंतर आरोपी टेम्पो घेऊन पळून गेला होता. या प्रकरणी दादर सागरी पोलीस ठाण्यात भा.द.वि. कलम ३५३, २७९, ३३६, २८३ पोलीस अधिनियम कायदा ११०, ११२, ११७ मोटार वाहन कायदा १३९, १७७ व १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फरार असलेल्या आरोपीला दादर सागरी पोलिसांनी शुक्रवारी अटक करून पेण न्यायालयात हजर करण्यात आले असता २७ जुलै पर्यंत १९ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या बाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक के.आर.भऊड हे करत आहेत.

## लाइफलाईन हॅस्पिटलमधील डायरेक्टर डॉ.जान्हवी पाटील यांच्या सतर्कतेमुळे वाचला वाहतूक पोलिसाचा जीव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील लाइफलाईन हॅस्पिटलच्या डायरेक्टर डॉक्टर जानवी पाटील यांच्या सतर्कतेमुळे आज वाहतूक पोलिसाचा जीव वाचला आहे.

डॉ.जानवी पाटील या खारघर कोपरा ब्रिज येथून आपल्या वाहनातून जात असताना एम एच ४६ बी झेड ६२९६ क्रमांकाची कार एका वाहतूक शाखेच्या पोलिस पोलीस कॉन्स्टेबल नामदेव गादेकर यांना बोनेटवर विरुद्ध दिशेने फरपटत नेत



असल्याचे त्यांना दिसून आले. त्यामुळे त्यांनी सदर गाडीचा पाठलाग करून त्या वाहनाला कोपरा ब्रिज पासून स्वर्णागंगा ज्वेलरी शॉप खारघर म्हणजे जवळपास अर्धा किलोमीटर गाडीच्या बोनेटवर ट्राफिक पोलीस ला फरपटत नेत असताना स्वतः ची गाडी त्या फरपटत घेऊन जाणाऱ्या गाडीच्या पुढे त्यांनी आपली आदी नेऊन त्या कारचालकाची गाडी थांबवली.

यावेळी पाठीमागून धावत येणारे पोलीस नाईक निवृत्ती भोईर यांनी त्या ड्रायव्हरला ताब्यात घेऊन त्याला खारघर पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले

तसेच पोलीस स्टेशन मधील स्टाफ ने डॉ.जानवी पाटील यांचे कौतुक करून मानवता दृष्टिकोन ठेवल्याबद्दल आभार मानले आहेत.

## नवीन शैक्षणिक धोरणांमुळे विद्यार्थ्यांना विविध पर्याय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अर्थात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) रायगड विभागाच्या वतीने दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर भरारी २०२२ हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते झाले.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणांमुळे वेगवेगळे पर्याय आपल्या समोर उपलब्ध आहेत. त्यामुळे आपण ज्या क्षेत्रात जाणार आहोत, त्या क्षेत्रातील कोणत्या आव्हानांना सामोरे जायाचे आहे, याची माहिती असणे गरजचे आहे. आयुष्यात मार्गदर्शन करणारे खूप असतात मात्र आपण कोणाच मार्गदर्शन घ्यायचे हे महत्त्वाचे आहे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

शिबिरासाठी वरिष्ठ समन्वयक दिपक पाटेकर, शिवव्याखाते, लेखक व करिअर मार्गदर्शक प्रशांत देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, एमकेसीएलचे कोकण विभाग समन्वयक जयंत भगत, रायगड विभाग समन्वयक मंगेश जाधव, सिद्धेश गोसावी यांच्यासह पदाधिकारी, विद्यार्थी आणि एमकेसीएलचे केंद्रातील पदाधिकारी उपस्थित होते. या शिबिरात एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक दीपक पाटेकर यांनी प्रत्यक्ष कार्यानुभवातून मार्गदर्शन केले, तसेच या वेळी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

आयुक्त गणेश देशमुख यांनी यशस्वी होण्यसाठी हुशार असाव लागत नाही, तर कष्टाळू असणे गरजेचे आहे, असे सांगितले. तर शिवव्याखाते, लेखक व करिअर मार्गदर्शक प्रशांत देशमुख यांनी शिवाजी महाराज यांच्या पुरंदरचा तह आढवा येसाजी, नेताजी, तानाजी, बाजी, रामजी, यांच्या त्यागातून नुकताचा स्वराज्य लुकलुकतय असा वाटत असताना मिर्जा राजा जयसिंग आला आणि २३ गड त्याच्या झोळीत टाकावे लागले. त्यानंतर औरंगजेबाच्या कैदेत राहावे लागले. राजांच्या या परिस्थीतीला समोर आपले संकट ठेवावे ते संकट सुर्या समोर काजवा असल्या सारखे वाटेल आणि जगण्याची आणि संघर्ष करण्याची प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

## उरण तालुक्यात लहान मुलांना पळविणारी टोळी सक्रिय

**दै.रायगड नगरी । उरण**

सध्या शाळा सुरु झाल्याने सर्व शाळा तसेच क्लासेस समोर व शाळा, क्लासेसच्या आजू बाजूच्या परिसरात लहान मुले, बालके यांची खूप मोठी गर्दी दिसत असते. पालकांचीही गर्दी यावेळी दिसून येते. शाळेत किंवा क्लासेसमध्ये कोण येतात, कोण जातात याकडे अनेकजण दुर्लक्ष करतात. प्रत्येकजण आपापल्या कामात व्यस्त आहेत. याचा फायदा मुलांना पळविणारी टोळीने घेतला आहे. आई वडील व्यस्त असल्याने त्याचा फायदा घेत काही अनोळखी व्यक्ती शाळेत किंवा क्लासेसमध्ये जाऊन मी मुलाला न्यायला आलो आहे, असे सांगून त्यानंतर मुलाला जवळ घेऊन चॉकलेट, खाद्य पदार्थ देऊन, वेगवेगळे आमिष दाखवून पळवून नेतात. तुझ्या आई वडिलांनी मला तुला न्यायला पाठविले आहे. असे सांगून सुद्धा मुलांना पळविण्याचे प्रकार उरण मध्ये सुरु आहेत. त्यामुळे पालकांना आता सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे. लहान मुलांना चोरणारी टोळी नजर चुकवून किंवा आमिष दाखवून लहान मुलांना पळवत असल्याने उरण मध्ये लहान मुलांना पळविणारी टोळी पुन्हा सक्रिय झाल्याचे दिसते.

उरण तालुक्यात सध्या दोन घटना समोर आल्या आहेत.पहिली घटना अशी आहे. नवघर गावातील बस स्टॉप जवळ एक मुलगा शाळेत जाण्यासाठी गाडीची वाट पाहत उभा होता.

अचानक एक महिला त्याच्यासमोर आली आणि त्याला चाकूचा धाक दाखवून घाबरविण्याचा प्रयत्न केला असता त्या मुलाने तेथून धाव ठोकून सरळ घर गाठला. आणि घडलेला सर्व प्रकार घरातील पालकांना सांगितला. दुसरी घटना अशी आहे की उरण जेएनपीटी समोरील कॉलनी मधील एका शिकवणी वर्गात एक अनोळखी इसम जाऊन एका मुलाला घरी घेऊन जाण्यासाठी आलो आहे असे सांगू लागला.

लहान मुलाने त्याच्यासोबत जाण्यासाठी नकार दिल्यानंतर शिक्षिकेने लगेच घरी फोन केला. तेव्हा समजले की कोणत्याही माणसाला मुलाला आणायला पाठविले नाही. शिक्षिका फोनवर बोलत असताना त्या अनोळखी माणसाला संशय आला आणि तो तेथून पळून गेला. त्यामुळे सर्व पालकांना विविध सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्त्यांनी विनंती केली आहे की सध्या सतर्क रहा. शाळेतून किंवा ट्युशन मधून मुलांना आणण्यासाठी उशीर होत असेल तर तसे वर्गातील शिक्षकांना फोन करून कळवा. शाळेत मुलाला सोडेपर्यंत व शाळा सुटल्यानंतर आपल्या मुलावर पालकांनी विशेष लक्ष द्यावे. अशी सूचना विविध सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्त्यांनी पालकांना केली आहे.


# समाज मंदिराचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोहिदास वाड्यात उभारण्यात आलेले समाजमंदिर हे महापालिका क्षेत्राती एक महत्वाचे आणि प्रतिष्ठीत अशी वास्तू येणाऱ्या काळात बनेल, असा विश्वास सभागृहनेते ठाकूर यांनी व्यक्त केले.

पनवेल शहारतील रोहिदास वाड्यात नव्याने उभारण्यात आलेल्या समाज मंदिराचा लोकार्पण सोहळा महापौर डॉक्टर कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर आणि माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर यांच्या हस्ते करून या समाज मंदिराचे लोकार्पण झाले.

पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, आणि नगरसेवक अनिल भगत यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शहरातील रोहिदास वाड्यात समाज मंदिर उभारण्यात आले आहे. ह्या समाजमंदिर उभारणीसाठी २ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी खर्च



करण्यात आला असून, यामध्ये वाचनालय, जीम, टेबल टेनिस, कॅरम बोर्ड तसेच सामाजिक कार्याक्रमांसाठी सभागृहा उपलब्ध आहे.

या लोकार्पण सोहळ्याला पनवेल महापालिकेचे नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचीता लोंढे, माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, रोहिदास समाजाचे अध्यक्ष लक्ष्मण कल्याणकर, शशिकांत मोहोकर, दिनकर गव्हाणकर, संजय जाधव, प्रविण मोहोकर, रजणीश जाधव, यशवंत जाधव, ताणाजी झुगे, मधुकर उरणकर, शांताराम कल्याणकर, प्रविण दुग्शीकर, राकेश जाधव, जिज्ञेश मोहोकर, सिद्धार्थ मोहिते यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान या मंदिरात बांधण्यात आलेल्या सभागृहाचे नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

# मारहाणीत आदिवासी व्यक्तीचा मृत्यू ; आरोपीला तीन तासात ‘बेड्या’ ; एकच खळबळ

**दै.रायगड नगरी । धाटाव**

बाचाबाची, शिवीगाळमधून राग अनावर झाला. त्याच रागातून लाकडी दांडक्याचा फटका बसल्याने आदिवासी समाजातील ४७ वर्षीय व्यक्तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. बेलवाडी आदिवासीवाडी येथिल विश्राम राजाराम पवार याची हत्या केल्याने आदिवासी समाज यांसह सर्वहारा जनआंदोलन संघटना आक्रमक झाली.

विश्राम पवार याच्या हत्येप्रकरणी आरोपी लक्ष्मण उर्फ बिनधास्त धनावडे याला कोलाड पोलिसांनी तीन तासात बेड्या ठोकल्या. गावातील राकेश गायकवाड, संदीप गायकवाड यांनी इकडे ये अशी हाक मारली. दादाच्या घरी ये, तुझ्या नवऱ्याला लक्ष्मण उर्फ बिनधास्त धनावडे याने डोक्यात लाकडी दांडका मारला आहे. तो बेशुद्ध पडला आहे, त्यानंतर वनिता पवार घरी, त्यावेळी हा गंभीर प्रकार समोर आला असे मयत इसमाची पत्नी वनिता विश्राम पवार हिने तक्रारीत नमूद केले.

अधिक उपचारार्थ विश्राम पवार याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. विश्राम पवार याच्या मृत्यूला कारणीभूत धरत आरोपी लक्ष्मण उर्फ बिनधास्त धनावडे याच्याविरुद्ध भादवी कलम ३०२ व अत्याचार प्रतिबंध व कायदा १९८९ चे कलम ३(२) (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती कोलाड पोलिसांनी दिली. दरम्यान, आदिवासी समाजाच्या व्यक्तीची हत्या केली, या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील बेलवाडी आदिवासीवाडीतील आदिवासी समाजातील विश्राम पवार याची रागाच्या भरात डोक्यात लाकडी दांडका मारून खून केल्याची घटना घडली. मारहाणीत विश्राम पवार बेशुद्ध पडला. त्याला तातडीने ग्रामीण रुग्णालय रोहा येथे उपचारासाठी आणले. मात्र विश्राम पवार याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचाराला प्रतिसाद न दिल्याने पवार याचा मृत्यू झाला. याबाबतची तक्रार मयताची पत्नी वनिता पवार यांनी केली. त्यानुसार आरोपी लक्ष्मण उर्फ बिनधास्त धनावडे याला विश्राम पवार यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आली. अधिक तपास पोलीस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुभाष जाधव व पोलीस अधिकारी करीत आहेत.

दरम्यान, रागाच्या भरात आदिवासी व्यक्तीला जीवानिशी संपविले ही धक्कादायक बाब आहे. हत्येप्रकरणी संबंधीत आरोपीला कठोर शासन व्हावे.

तपास जलद व्हावा अशी मागणी सर्वहरा जनआंदोलनाचे सोपान सुतार यांनी केली तर संबंधीत आरोपीच्या तीन तासात मुसक्या आवळल्या, खून प्रकरणी संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांनी दिली.

# जासई हायस्कूलमध्ये मोफत वह्या वाटप कार्यक्रम संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, संस्कृती आणि आरोग्य क्षेत्रात गेली अनेक वर्ष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील जुनिअर कॉलेज, जासई येथे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुरेश पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण जगे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते हा वह्या वाटप कार्यक्रम करण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकर हे एक दानशूर व्यक्तिमत्व असून त्यांनी रयत शिक्षण संस्थेला व या हायस्कूलला अनेक वेळा मोठी मदत केली आहे. त्यांच्या या दानशूर कार्याबद्दल, प्रमुख पाहुणे मा.सुरेश पाटील यांनी श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाविषयी आपल्या मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली. विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांनीही श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे आभार मानले.

विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत या विद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप केल्याबद्दल मंडळाचे आभार व्यक्त केले.

तर जासई गावचे शिक्षण प्रेमी ग्रामस्थ सुनिल घरत यांनीही आपल्या मनोगता मधून रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी मधुकर पाटील, गोपीनाथ म्हात्रे, सौ योगिता म्हात्रे, सौ अरुणाताई घरत, घरत टी. टी.मॅडम, अमृत ठाकूर तसेच विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ मयुरा ठाकूर मॅडम यांनी केले.

# कळंबोली विद्यालयात घुमला विठ्ठल नामाचा गजर

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली मधील मराठी प्राथमिक विद्यालयातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशात आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येला विठू नामाचा गजर करीत दिंडी काढून सर्वांचेच लक्ष वेधले. यावेळी विठुरायाच्या गजर संपूर्ण विद्यालय परिसरात घुमला. याप्रसंगी शिक्षक वर्गाने ही विठुरायाच्या गजरात तल्लीन होऊन फेर धरला. विद्यालयात विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी. संस्कृतीचे जतन त्यांच्या भावी पिढीत सशक्त व स्वावलंबी बनण्यास उपयुक्त व्हावे. याकरता विद्यालयाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजन करून विद्यार्थ्यांना घडवले जात असल्याचे मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी सांगितले.



कळंबोली वसाहती मधील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलातील मराठी प्राथमिक विद्यालय मध्ये शनिवारी पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी दिंडीचे आयोजन केले होते. याप्रसंगी विठू माऊलीच्या मूर्तीचे पूजन करून विद्यार्थी पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे पूजन करून दर्शन घेतले. आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला विद्यालयामार्फत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेशात भगवी ध्वज फडकवीत व विठू नामाचा गजर करीत दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वसाहती मधील नागरिकांनीही या दिंडीचे स्वागत करून विद्यार्थ्यांच्या धन्यवाद देऊन कौतुकही केले. यावेळी विठू नामाचा गजर करीत विद्यालयातील शिक्षक वर्ग ही तल्लीन झाला होता. विद्यालयात आलेल्या पालकांनीही विठू माऊलीच्या मूर्तीचे दर्शन घेऊन विद्यालयाला धन्यवाद दिले.